॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

शुभ दीपावली

अहिल्यानगर ■ शनिवार, दि. ७ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ११९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

SPOT NEWS

मुंबई उच्च न्यायालय बॉम्बने उडविण्याची धमकी

● **मुंबई** – मुंबईतील ऐतिहासिक आणि अत्यंत सुरक्षित मानल्या जाणा-या मुंबई उच्च न्यायालयाला लक्ष्य करण्याची धमकी एका ई-मेलद्वारे देण्यात आली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, उच्च न्यायालयाच्या प्रशासकीय विभागाला गुरुवारी रात्री उशिरा एक ई-मेल प्राप्त झाला. ज्यामध्ये अत्यंत आक्षेपार्ह भाषेत, मुंबई उच्च न्यायालयाची इमारत बॉम्बने उडवून दिली जाईल असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता. प्रशासनाने या गंभीर ई-मेलची तात्काळ दखल घेत मुंबई पोलिस आयुक्तालय आणि स्थानिक आझाद मैदान पोलिस ठाण्याला याची माहिती दिली. माहिती मिळताच रात्रीपासूनच पोलिस प्रशासन ॲक्शन मोडमध्ये आले. सुरक्षा यंत्रणांनी तात्काळ मुंबई उच्च न्यायालयाच्या हेरिटेज इमारतीला, तसेच नवीन विस्तारित परिसराला वेढा घातला. सुरक्षेचा उपाय म्हणून न्यायालय परिसरातील प्रत्येक कोप-याची कसून तपासणी करण्यात येत आहे. दरम्यान, हा ई-मेल कुठून आला, त्याचा आयपी ॲड्रेस काय आहे आणि यामागे कोणत्या समाजकंटकाचा किंवा दहशतवादी संघटनेचा हात आहे का, याचा तांत्रिक तपास मुंबई पोलिसांचे सायबर सेल आणि गुन्हे शाखा अत्यंत गोपनीयतेने करत आहेत.

अजितदादा असते तर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्या असत्या!

● **मुंबई** – अजित पवार हयात असते, तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पुन्हा एकत्र आले असते. महायुतीत जाण्यापूर्वी त्यांनी विलीनीकरणाच्या चर्चा स्वतःच्या पातळीवर पुढे नेल्या होत्या, अशी खळबळजनक माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली. अजित पवार यांच्या निधनानंतर तटकरे यांच्या या विधानामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना तटकरे यांनी स्पष्ट केले की, सध्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलीनीकरणाची कोणतीही चर्चा सुरू नाही. मात्र, अजित पवार हयात असताना दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाबाबत निश्चितपणे चर्चा झाली होती. विलीनीकरणाची रूपरेषा आणि नियोजनही अजितदादांनी स्पष्ट केले होते. त्यांच्या प्रबळ इच्छाशक्तीमुळे हे विलीनीकरण शक्य झाले असते, असे तटकरे यांनी सांगितले. अजित पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे ही राजकीय प्रक्रिया थांबली आणि विलीनीकरणाची चर्चा मागे पडली. अजितदादा आज हयात असते, तर चर्चेत असलेली १२ फेब्रुवारीची तारीख निश्चित झाली असती आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकाच छताखाली आले असते, असेही तटकरे यांनी नमूद केले.

‘मराठवाडा वॉटर ग्रीड’ प्रकल्पाला गती द्या

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस । जायकाकडून २० हजार कोटींच्या निधीचा सकारात्मक प्रतिसाद

● **मुंबई । वीरभूमी** –

मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढून हा भाग दुष्काळमुक्त करण्यासाठी राज्य सरकारने आता पावले उचलली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील ‘वर्षा’ शासकीय निवासस्थानी पार पडलेल्या उच्चस्तरीय बैठकीत बहुप्रतिक्षित ‘मराठवाडा वॉटर ग्रीड’ प्रकल्पाला गती देण्याचे निर्देश देण्यात आले. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी जपान इंटरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी कडून तब्बल २० हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य मिळण्याच्या मार्गातील अडथळे दूर होत असून, जायकाने याविषयी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दर्शविला आहे.



मराठवाड्यातील पाण्याचे असमान वितरण दूर करण्यासाठी अतिरिक्त पाणीसाठा असलेल्या धरणांमधून दुष्काळी भागातील धरणांपर्यंत बंदिस्त पाइपलाइनद्वारे पाणी पोहोचवण्याची ही योजना आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर आणि धाराशिव या ४ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये जायकवाडी, माजलगाव, मांजरा, उजनी, निम्न तेरणा आणि निम्न मनार ही धरणे एकमेकांशी जोडली जाणार आहेत. या पहिल्या टप्प्यात सुमारे ३ हजार ९५ किलोमीटर लांबीच्या मुख्य व दुय्यम पाइपलाइन आणि १५ जलशुद्धीकरण केंद्रांची उभारणी केली जाईल, ज्याचा थेट फायदा या भागातील सुमारे १ कोटी नागरिकांना होणार आहे.

बैठकीत केवळ वॉटर ग्रीडच नव्हे, तर महाराष्ट्र आणि जपान यांच्या सहकार्याने सुरू असलेल्या इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांचाही आढावा घेण्यात आला. ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स (AVGC) क्षेत्रात महाराष्ट्राला जागतिक स्तरावर नेण्यासाठी जपानी कंपन्या आणि ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीज’ (IICT) यांच्या सहकार्याने उपक्रम राबवले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून येत्या फेब्रुवारी महिन्यात मुंबईत ’मांगा कारवान’ आयोजित करण्यात येणार असून, मुख्यमंत्री फडणवीस यांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

पायाभूत सुविधा, पाणी, वाहतूक आणि पर्यावरण क्षेत्रातील प्रकल्पांसाठी राज्य शासन जपानसोबतचे सहकार्य आणखी दृढ करणार असून सर्व प्रकल्पांना शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्यासह जपानच्या महावाणिज्यदूत हितोमी सातो आणि जायकाचे अधिकारी उपस्थित होते.

प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये आणि जपानचे प्रगत तंत्रज्ञान

■ संपूर्ण ८ जिल्ह्यांतील वॉटर ग्रीड प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे २५ हजार ५६ कोटी रुपये असून, पहिल्या टप्प्यासाठी जायकाकडून २० हजार कोटींचे कर्जसहाय्य मिळणार आहे.

■ लातूर आणि धाराशिव हा भाग भूकंपप्रवण क्षेत्रात असल्याने, प्रकल्पाच्या बांधकामात डक्टाईल आयर्न पाइप्स, आधुनिक पंपिंग यंत्रणा आणि SCADA प्रणालीसह जपानचे प्रगत भूकंपरोधक तंत्रज्ञान वापरले जाणार आहे.

■ छत्रपती संभाजीनगरमधील ऑरिक सिटी, शेंद्रा-बिडकीन आणि वाळूज औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांनाही यामुळे शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे.

■ २०२९ पर्यंत या प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने आता युद्धपातळीवर नियोजन करण्यात आले आहे.

आता १ जानेवारी २०२७ पर्यंत एनसीएमसी कार्डची सक्ती नाही : ना. सरनाईक

● **मुंबई । वीरभूमी** –

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एमएसआरटीसी) लालपरीतून प्रवास करणा-या राज्यातील लाखो महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी राज्य सरकारने अत्यंत मोठा आणि दिलासादायक निर्णय जाहीर केला आहे. एसटी प्रवासातील सवलतींसाठी अनिवार्य करण्यात आलेले नॅशनल कॉमन मोबीलिटी कार्डची सक्ती पुढे ढकलली असून आता १ जानेवारी २०२७ पर्यंत कार्डची सक्ती नसणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

शासनाने प्रवाशांना पारदर्शक व जलद सेवा देण्यासाठी सुरू केलेल्या या मोहिमेत ग्रामीण भागातील अडचणींचा विचार करून ही मुदतवाढ देण्यात आली आहे. १ ऑक्टोबर २०२६ पासून एसटी प्रवासातील सवलतींसाठी ठउटउ कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, दुर्गम आणि ग्रामीण भागातील अनेक महिला लाभार्थ्यांपर्यंत या योजनेची माहिती न पोहोचल्याने लाखो पात्र महिला अजूनही नोंदणी करू शकलेल्या नाहीत.

विविध प्रवासी संघटना, सामाजिक संस्था, आमदार, खासदार आणि राजकीय पक्षांच्या नेत्यांनी शासनाकडे याबाबत तक्रारी नोंदवून मुदतवाढीची जोरदार मागणी केली होती. या सर्व बाबींचा सकारात्मक विचार करत शासनाने हा निर्णय १ जानेवारी २०२७ पर्यंत लांबणीवर टाकला आहे.

राज्यात राबवण्यात आलेल्या या मोहिमेत आतापर्यंतचा टप्पा आणि पुढील नियोजन स्पष्ट करण्यात आले आहे. आतापर्यंत राज्यभरात तब्बल १ कोटी १० लाख एनसीएमसी स्मार्ट कार्डांची अधिकृत नोंदणी आणि प्रत्यक्ष वितरण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे. उर्वरित पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी एसटी महामंडळाने आता प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर विशेष नोंदणी शिबिरे आयोजित करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रवासी संघटना आणि ग्रामपंचायतीच्या पदाधिका-यांच्या मदतीने ही शिबिरे राबवून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातील सर्व पात्र महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची १००% नोंदणी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महामंडळाने ठेवले आहे.

अहिल्यानगरच्या ८ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ४०३ कोटी जमा

दिवाळीपूर्वी अग्रीम मदतीचे वितरण; संकटातील शेतकऱ्यांना दिलासा : राधाकृष्ण विखे पाटील

● **अहिल्यानगर । वीरभूमी** –



जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली आहे. नुकसानभरपाईपोटी अग्रीम मदत म्हणून जिल्ह्यातील ८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत प्रत्येकी पाच हजार रुपये जमा करण्यात आले आहेत. या माध्यमातून सुमारे ४०३ कोटी ६४ लाख रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा सातत्याने आढावा घेऊन शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी शासनस्तरावर केलेल्या पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर या मदत वितरणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये पावसाने दिलेली ओढ, पिकांचे नुकसान, घटलेले उत्पादन आणि वाढता शेतीखर्च यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले होते. राज्य सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याची घोषणा केली होती.

दुष्काळाची गंभीरता लक्षात घेऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात टंचाई आढावा बैठका घेतल्या. परिस्थितीचा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करून प्रशासनाला आवश्यक उपाययोजनांच्या सूचना दिल्या.

राज्य सरकारने जाहीर केलेल्या मदतीच्या पहिल्या टप्प्यातच जिल्ह्याचा समावेश झाल्याने शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. त्यानुसार शासनाने मदत वितरणाची प्रक्रिया राबवून जिल्ह्यातील ८ लाख ७ हजार २८४ शेतकऱ्यांच्या खात्यांत प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे ४०३ कोटी ६४ लाख रुपये जमा केले. थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून वितरित झालेल्या या मदतीमुळे संकटातील शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळाला आहे.

‘ई २०’ पेट्रोलच्या नावाखाली ३१ टक्क्यांपर्यंत इथेनॉलची विक्री?

कर्नाटक सरकारचा धक्कादायक दावा; वाहनचालकांच्या नुकसानभरपाईसाठी केंद्राकडे ‘स्पॉयलेज फंड’ची मागणी

● **बंगळूरू । वीरभूमी**–

देशभरात विक्री होणा-या ई २० पेट्रोलवरून निर्माण झालेला वाद आता पुन्हा सुरु होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सरकार आणि तेल कंपन्या पेट्रोलमध्ये केवळ २० टक्के इथेनॉल मिसळत असल्याचा दावा करत असल्या, तरी कर्नाटक सरकारने घेतलेल्या पेट्रोलच्या नमुन्यांमध्ये ठरवून दिलेल्या २० टक्के मर्यादेपेक्षा कितीतरी जास्त इथेनॉल आढळल्याचा धक्कादायक दावा केला आहे. काही पेट्रोल पंपांवर तर हे प्रमाण थेट ३१.२ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. या प्रकारामुळे ग्राहकांच्या वाहनांचे आतोनात नुकसान होत असून कर्नाटक सरकारने हा तपासणी अहवाल केंद्र सरकारकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

कर्नाटक सरकारने विविध पेट्रोल पंपांवरून पेट्रोलचे नमुने घेऊन त्याची प्रयोगशाळेत चाचणी केली. इंडियन ऑइल, हिंदुस्तान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम, नायरा आणि शेल या नामांकित कंपन्यांच्या पेट्रोल पंपांवरून एकूण ६३ नमुने गोळा करण्यात आले होते. धक्कादायक बाब म्हणजे, ६३ पैकी एकाही पेट्रोल पंपावर नियमानुसार २० टक्के किंवा त्यापेक्षा कमी इथेनॉल असलेले पेट्रोल आढळले नाही. उलट, सर्वच ठिकाणी इथेनॉलचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त होते. राज्यातील ७ जिल्ह्यांमधील नमुन्यांमध्ये तर हे प्रमाण प्रचंड वाढलेले दिसले.



सरकारने सुरुवातीला या नमुन्यांबाबत संबंधित तेल कंपन्यांना विचारणा केली होती. मात्र, कंपन्यांच्या प्रयोगशाळांकडून आणि व्यवस्थापनाकडून यावर कोणतेही स्पष्ट उत्तर न मिळाल्याने अखेर खाजगी प्रयोगशाळेत या चाचण्या करण्यात आल्या, असे राज्य सरकारने स्पष्ट केले.

पेट्रोलमध्ये प्रमाणाबाहेर इथेनॉल मिसळल्याने वाहनांचे आणि ग्राहकांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे कर्नाटक सरकारने म्हटले आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण जास्त असल्यास वाहनाची इंधन कार्यक्षमता (माइलेज) १० टक्क्यांपर्यंत घसरते. यामुळे राज्यातील आणि देशातील वाहनचालकांना दरवर्षी अंदाजे ६२ हजार कोटी रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. जास्त इथेनॉलमुळे वाहनांच्या इंजिनचे अंतर्गत भाग खराब होतात. पाईप्स आणि इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळे दुरुस्ती आणि सर्व्हिसिंगचा खर्च वाढतो, ज्याचा बोजा वर्षाला ३९ हजार कोटींवर जातो.

कर्नाटकचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री रिजवान अरशद यांनी या प्रकरणी केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी केली आहे. कंपन्यांच्या मनमानीमुळे आणि चुकीच्या मिश्रणामुळे वाहनचालकांना नाहक सोसावे लागत आहे. त्यामुळे केंद्राने तात्काळ एक ‘स्पॉयलेज फंड’ तयार करावा. या निधीमधून ज्या वाहनचालकांच्या गाड्यांचे अवाजवी इथेनॉलमुळे नुकसान झाले आहे किंवा ज्यांना आर्थिक फटका बसला आहे, त्यांना नुकसानभरपाई किंवा रिफंड दिला जावा, असे अरशद यांनी म्हटले आहे. सध्या या गंभीर तपासणी अहवालामुळे देशभरातील तेल कंपन्यांच्या कार्यपद्धतीवर आणि ई २० इंधन धोरणावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वीरभूमी

SPOT NEWS

अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या सावेडी शाखेत दिवाळी अंकांचे वितरण

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

दीपावलीची सर्वत्र धूम सुरू असताना नगर शहरातील सावेडी उपनगरातील रसिक वाचकांसाठी यंदाची दिवाळी आगळीवेगळी ठरणार आहे. दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या जॉगिंग ट्रॅकजवळील सावेडी शाखेत विविध दिवाळी अंकांची मेजवानी उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिवाळी अंकांचे वितरण उद्योजिका शिवानी देशमुख व स्मिता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. राजा ठाकूर, संचालिका प्रा. ज्योती कुलकर्णी, संचालक व कवी चंद्रकांत पालवे, गौरी जोशी, वाचक डॉ. धर्माधिकारी, अजित कटारिया, ग्रंथपाल अमोल इथापे, सारिका देव आदी उपस्थित होते. उद्योजिका शिवानी देशमुख यांनी मराठी संस्कृतीत दिवाळी अंकांचे मोठे योगदान असून, या उपक्रमामुळे सावेडीतील वाचकांची दिवाळी अधिक दैदीप्यमान होणार असल्याचे सांगितले. डॉ. राजा ठाकूर म्हणाले, विचारांची, संस्कारांची आणि आत्मिक आनंदाची दिवाळी साजरी करण्यासाठी दिवाळी अंकांचे योगदान अमूल्य आहे. या अंकांमुळे रसिक वाचकांना आगळीवेगळी मेजवानी मिळणार आहे. प्रास्ताविकात प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी उपक्रमाची माहिती दिली. सावेडी जिल्हा वाचनालयात दीपावलीनिमित्त विनोदी, क्रीडा, पाककृती, कथा, विज्ञान, धार्मिक, बालकथा, फॅशन आणि भविष्यविषयक अंकांसह सर्व वृत्तपत्रांचे दिवाळी अंक उपलब्ध असल्याचे सांगून वाचकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी स्मिता देशमुख, गौरी जोशी, कवी चंद्रकांत पालवे, डॉ. धर्माधिकारी आणि अजित कटारिया यांनी मनोगते व्यक्त केली. मान्यवरांचा सन्मान प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी केला, तर आभार ग्रंथपाल अमोल इथापे यांनी मानले. कार्यक्रमाला रसिक वाचक, सभासद आणि वाचनालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या माणुसकीच्या दिव्यांनी गरजूंची दिवाळी उजळली!

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

दीपावली म्हणजे आनंद, उत्साह, प्रकाश आणि मांगल्याचा सण! मात्र समाजातील प्रत्येक घटकाला हा सण आनंदाने साजरा करता येतोच असे नाही. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गरजू कुटुंबांना सणाच्या आनंदापासून वंचित राहावे लागते. अशा कुटुंबांच्या जीवनातही दीपावलीचा आनंद फुलावा, या उदात्त भावनेतून रयत शिक्षण संस्थेच्या विश्वशंकर प्राथमिक विद्यालय, भिंगार येथील विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत गरजूंना दीपावलीनिमित्त जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. दीपावलीच्या सणानिमित्त केवळ स्वतःच्या घरात आनंद साजरा न करता समाजातील वंचित आणि गरजू घटकांच्याही जीवनात आनंदाचा प्रकाश पोहोचविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. त्यानुसार विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या मदतीने तसेच स्वतः पुढाकार घेऊन दीपावलीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध वस्तू जमा केल्या.

भीमाशंकर सह्याद्रीतील कुऱ्हाडबंदीविरोधात आदिवासींचा एल्गार!

आमरण उपोषणाला समाजसेवक अनंत घाणे यांच्यासह आदिवासी बांधवांचा पाठिंबा

● **अकोले । वीरभूमी–**



भीमाशंकर अभयारण्य आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगांतील आदिवासींचे पारंपरिक हक्क, पर्यावरण संरक्षण व स्थानिकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी सुरू असलेल्या कुऱ्हाडबंदीविरोधातील आमरण उपोषणाला तीव्र पाठिंबा मिळत आहे. समाजसेवक अनंत महादू घाणे यांच्यासह तुकाराम सोमा खाडे, रामदास पिचड, सचिन भवारी, मच्छिंद्र खाडे, दिलीप भागडे, योगेश खाडे, पंढरी खाडगीर, तुकाराम खाडे, सुनील पवार आणि आदिवासी बांधवांनी आंदोलनाला जाहीर पाठिंबा दिला.

उपोषणस्थळी प्रांताधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, वन्यजीव विभाग, पोलीस प्रशासन आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी कुऱ्हाडबंदीचा निर्णय रद्द करावा, इको सेन्सिटिव्ह झोनबाबत स्थानिकांना विश्वासात घ्यावे, आदिवासी समाजाला विश्वासात न घेता निर्णय लादू नयेत, पेसा कायद्याची अंमलबजावणी करावी, लघुवनोपजाला हमीभाव द्यावा आणि स्थानिकांना व्यापारीकरणापासून दूर ठेवू नये, अशा मागण्या उपोषणकर्त्यांनी मांडल्या.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः उपोषणस्थळी उपस्थित राहून आंदोलनकर्त्यांशी चर्चा करावी, अशी ठाम मागणी उपोषणकर्ते आणि समाजसेवक अनंत घाणे यांनी केली. केवळ आश्वासनांवर प्रश्न सुटणार नसून सह्याद्री परिसरातील आदिवासींचे प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत, उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीची गांभीर्याने दखल घ्यावी आणि मागण्या लेखी स्वरूपात मान्य कराव्यात, अशी भूमिका त्यांनी मांडली.

आदिवासी समाजाचे जीवन जंगलाशी जोडलेले आहे. त्यामुळे वनसंवर्धनाच्या निर्णयांमध्ये स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात घेणे, पेसा व वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

आमरण उपोषण सुरू असल्याने उपोषणकर्त्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी येऊन चर्चा करावी, मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि लेखी आश्वासन देऊन प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

वालुंबा नदीपात्रात अवैध वाळू उपशाची चौकशी करून दंडात्मक कारवाई करा : रोडे

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**


अहिल्यानगर तालुक्यातील मौजे भोरवाडी शिव ते खडकी शिवदरम्यानच्या सुमारे नऊ किलोमीटर परिसरातील वालुंबा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची महसूल विभागामार्फत तातडीने चौकशी करून प्रत्यक्ष स्थळपाहणी व पंचनामा करावा, तसेच दोषींवर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी तसेच राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी निवेदन पाठविले आहे.

समितीने दिलेल्या निवेदनानुसार, मौजे भोरवाडी शिव ते जाधववाडी–अकोळनेर परिसरापर्यंतच्या वालुंबा नदीपात्रात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा आणि वाळू तस्करी सुरू असल्याचा आरोप आहे. जेसीबी मशीन आणि अनेक डंपरच्या सहाय्याने नदीपात्रात खोलवर मोठमोठे खड्डे खोदून वाळू काढण्यात आली आहे. हा उपसा नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला बाधा पोहोचविणारा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या अनधिकृत उत्खननामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर परिणाम होण्याबरोबरच नदीकाठच्या शेतजमिनी, शेतकऱ्यांच्या विहिरी आणि बंधाऱ्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे समितीने म्हटले आहे. त्यामुळे संबंधित विभागाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे. वालुंबा नदीपात्राची महसूल विभाग, तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्या माध्यमातून तातडीने पाहणी करून अधिकृत पंचनामा करावा. तसेच ईटीएस (इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन) तंत्रज्ञानाद्वारे उत्खननाची मोजणी करून प्रत्यक्ष किती वाळूचा उपसा झाला आहे, याची निश्चिती करावी. अवैध उत्खनन करणारे ठेकेदार अथवा संबंधित व्यक्ती आढळल्यास त्यांच्याकडून नियमानुसार दंड वसूल करावा.

पारनेर तालुक्यात वसुबारस सण उत्साहात

● **पारनेर । वीरभूमी–**



हिंदू धर्मातील दिवाळी सणाचा प्रारंभ मानला जाणारा वसुबारस हा सण पारनेर तालुक्यात मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. पारनेर शहरातील संभाजी मगर आणि परिवाराने गाय आणि वासराचे पूजन करून श्रद्धा, भक्तीभाव आणि उत्साहाने वसुबारस साजरी केली.

भारतीय संस्कृतीत गायीला मातेचे स्थान देण्यात आले असून, तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी वसुबारस सण साजरा केला जातो. या दिवशी सकाळपासूनच ग्रामीण भागातील घरांमध्ये आणि गोठ्यांमध्ये लगबग पाहायला मिळाली. शेतकरी कुटुंबांनी आपल्या गायी व वासरांना आंघोळ घालून त्यांना सजविले. गायींच्या शिंगांना रंग लावण्यात आले, तसेच गळ्यात फुलांच्या माळा आणि आकर्षक सजावट करण्यात आली. यानंतर गायीची व वासराची हळद–कुंकू, अक्षता, फुले आणि नैवेद्य अर्पण करून विधिवत पूजा करण्यात आली. महिलांनी गायीची आरती करून कुटुंबाच्या सुख–समृद्धीसाठी तसेच शेतीत भरघोस उत्पन्न मिळावे आणि पशुधन निरोगी राहावे, यासाठी प्रार्थना केली.पारनेर तालुका हा शेतीप्रधान तालुका असल्याने येथील शेतकरी जीवनात गोधनाला विशेष महत्त्व आहे. शेतीकामापासून ते दुग्धव्यवसायापर्यंत गायींचे योगदान मोठे आहे. त्यामुळे वसुबारस हा सण केवळ धार्मिक परंपरा नसून शेतकरी आणि पशुधन यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करणारा सण मानला जातो.या सणाच्या निमित्ताने ग्रामीण भागात भक्तिमय आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. नव्या पिढीला भारतीय संस्कृती, परंपरा आणि पशुधनाचे महत्त्व समजावे, यासाठी कुटुंबातील ज्येष्ठांनी मुलांना वसुबारस सणाचे महत्त्व सांगितले. अशा प्रकारे पारनेर तालुक्यात वसुबारस सण पारंपरिक उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

दुष्काळात पारनेरकरांसाठी माणुसकीचा झरा!

। बाळासाहेब औटी गुरुजी, बाळासाहेब कोकाटे आणि अर्जुनराव कवाद यांचा पुढाकार
। खासगी कूपनलिकेतील पाणी शहराला मोफत देणार

● **पारनेर । वीरभूमी–**



शहरावर दुष्काळाचे सावट गडद होत असताना पारनेरकरांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी खासगी मालकीच्या कूपनलिकेतील पाणी नगरपंचायतीला विनामोबदला उपलब्ध करून देण्याचा निर्णय बाळासाहेब औटी (गुरुजी), बाळासाहेब कोकाटे आणि अर्जुनराव कवाद यांनी घेतला आहे. या तिन्ही दानशूर व्यक्तींनी कोणताही मोबदला न घेता स्वतःच्या जागेतील कूपनलिका शहरवासीयांसाठी खुली करून दिल्याने सर्वत्र कौतुक होत आहे.

शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी मनकर्णिका विहीर आणि नगरपंचायतीची कूपनलिका हे महत्त्वाचे स्रोत आहेत. मात्र, तीव्र दुष्काळामुळे या दोन्ही स्रोतांतील पाणीसाठा कमी झाला आहे. अशा परिस्थितीत खासगी कूपनलिकेतील पाणी उपलब्ध झाल्याने शहराला मोठा आधार मिळणार आहे.

माजी पाणीपुरवठा सभापती नंदूशेठ देशमुख यांचे बंधू आबासाहेब देशमुख यांनी या तिन्ही व्यक्तींच्या खासगी कूपनलिकेत मुबलक पाणी असल्याची माहिती दिली. त्यानंतर बाळासाहेब औटी, बाळासाहेब कोकाटे आणि अर्जुनराव कवाद यांनी सामाजिक बांधिलकी जपत नगरपंचायतीला हे पाणी मोफत देण्याची तयारी दर्शविली.

या कूपनलिकेत ५०० फूट पाइप टाकून दोन ते तीन दिवसांपूर्वी प्राथमिक चाचणी घेण्यात आली. सध्या कूपनलिका कृषी वीजजोडणीवर असून, ती गावठाण वीजजोडणीवर घेऊन पुन्हा चाचणी करण्यात येणार आहे. प्राथमिक चाचणीत कूपनलिका सलग आठ तास सुरू राहिल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी हा स्रोत महत्त्वपूर्ण ठरण्याची आशा व्यक्त होत आहे.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शहराचा पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी पाणीपुरवठा सभापती योगेश मते यांनी तत्परतेने प्रयत्न सुरू केले आहेत. उपलब्ध पाणीस्रोतांचा योग्य वापर करून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने नगरपंचायत प्रशासन प्रयत्नशील आहे.

पुढील सात महिने दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून, पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध पाण्याचे नियोजन करणे ही काळाची गरज बनली आहे. स्वतःच्या मालकीच्या कूपनलिकेतील पाणी कोणताही मोबदला न घेता शहरवासीयांसाठी उपलब्ध करून देणाऱ्या बाळासाहेब औटी, बाळासाहेब कोकाटे आणि अर्जुनराव कवाद या तिन्ही दानशूर व्यक्तींचा नगरपंचायतीच्या वतीने आदरपूर्वक सन्मान करण्यात येणार आहे. दुष्काळाच्या संकटात केवळ स्वतःचा विचार न करता संपूर्ण शहराच्या पाण्याची चिंता करणाऱ्या या तिन्ही व्यक्तींनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे. पैशाने नव्हे, तर माणुसकीने श्रीमंत असलेल्या या पारनेरकरांनी दुष्काळात खऱ्या अर्थाने माणुसकीचा झरा खुला केला आहे.

नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा

■ आगामी काळात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याने प्रत्येक नागरिकाने पाण्याचा काटकसरीने वापर करावा. ज्यांच्याकडे मुबलक पाणी आहे, त्यांनी स्वतःच्या गरजेपुरता पाणीसाठा करून ठेवावा. तसेच खासगी कूपनलिका असून त्यामध्ये पुरेसे पाणी उपलब्ध असलेल्या नागरिकांनी सामाजिक बांधिलकीतून एक–दोन टँकर पाणी उपलब्ध करून दिल्यास पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्यास हातभार लागेल.

– प्रियांका शिंदे,
मुख्याधिकारी, पारनेर नगरपंचायत

ॲड. स्वाती जाधव यांना राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा' पुरस्काराने सन्मानित!



● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा सन्मान सोहळा २०२६' मध्ये शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख ॲड. स्वाती राजेंद्र जाधव यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. पुणे येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंधगाव येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

ॲड. स्वाती राजेंद्र जाधव यांनी सामाजिक क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

ॲड. स्वाती राजेंद्र जाधव यांनी सामाजिक क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

या सोहळ्यास महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर, पुणे गुन्हे शाखेच्या IPS अधिकारी तेजस्विनीताई सातपुते, समाजसेविका डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे तसेच मुंबईच्या महापौर सौ. रितुताई राजेश तावडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

५% निधीच्या माध्यमातून मिळणाऱ्या किराणा किटमुळे दिव्यांगाची दिवाळी गोडं

● अहिल्यानगर । वीरभूमी –

स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून मिळणारा ५% निधी शेंडी ग्रामपंचायतीने किराणा किटच्या माध्यमातून खर्च केला यामुळे दिव्यांगच्या चेहऱ्यावर हसू निर्माण झाल्याचा आनंद हा काही वेगळा असतो त्याबद्दल नक्कीच शेंडी ग्रामपंचायतीचे मनापासून धन्यवाद देतं आमदार अक्षयदादा कर्डीले यांनी सर्व उपस्थिती कार्यकर्ते यांचे कौतुक केले. प्रत्येक गावाने आपल्या स्थानिक विकास निधीच्या माध्यमातून मिळणाऱ्या ५ टक्के निधीचा वापर करून गावातील दिव्यांग बंधू व भगिनीं यांना वस्तू स्वरूपात किंवा किराणा स्वरूपात वाटप करून प्रत्येकाच्या जीवनात आनंद देण्याचे काम करावे,तसेच स्व.आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्या माध्यमातून नेहमीच दिव्यांगानां प्राधन्याने लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत होते हे आवर्जून सांगितले.तसेच दिव्यांगाचें असणारे अडचणी व समस्या बाबत,महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.फडणवीस साहेब यांच्या पर्यंत लवकर माडणार आहें. हे यावेळी सांगितले. व सदर उपक्रमाचे कौतुक केले. असें उपक्रम प्रत्येक ग्रामपंचायतीने करून एक वेगळा आदर्श निर्माण करावा अशा आपल्या भाषणात आवर्जून सांगितले.व सर्वांना दिवाळी व पाडव्याच्या निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. आम्ही सदैव ग्रामपंचायतिच्या माध्यमातून गावातील दिव्यांग बंधू भगिनीं यांना सहकार्य करून प्रत्येक वर्षी निधीचे वाटप करून मदत करत असतो असं शेंडी ग्रामपंचायत सरपंच सौ. प्रयागा लोंढे यांनी सांगितले. शासन निर्णय २०१६नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने दिव्यांगसाठी असणारा ५ टक्के निधी खर्च करणे आवश्यक असते, आम्ही वारंवार निवेदनाच्या माध्यमातून पाठपुरावा करत असतो. आमच्या पाठपुराव्याला निश्चितचं काही प्रमाणात यश मिळत असल्याचे समाधान आम्हाला मिळते, आज दिवाळीच्या निमित्त शेंडी गावातील ३२ दिव्यांगाना किराणा वाटप करून एक वेगळा आदर्श निर्माण केल्याचा आनंद वाटतो असें गौरोदगार भाजपा दिव्यांग विकास आघाडी जिल्हा अध्यक्ष वसंत शिंदे यांनी काढले.

शेतकऱ्याचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण!

● अहिल्यानगर । वीरभूमी –

जमीन व्यवहारातील कथित फसवणूक, लाचखोरी तसेच महसूल विभागातील कर्मचाऱ्यांकडून होत असलेल्या त्रासाला कंटाळून पाथर्डी तालुक्यातील कुत्तरवाडी येथील शेतकरी अंबादास दादाबा गायकवाड यांनी इतर १५ व्यक्तींसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. आपल्या विविध मागण्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. या उपोषणात शेतकरी अंबादास दादाबा गायकवाड यांच्यासह वसंत खेडकर, बाबुराव खेडकर, केशव खेडकर, विष्णू खेडकर, देविदास खेडकर आदींसह कुटुंबातील महिला शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या आहेत. निवेदनात नमूद केल्यानुसार, कुत्तरवाडी येथील जुना सर्व्हे क्रमांक २२६ आणि नवीन सर्व्हे क्रमांक ६६/१/अ/१ मधील जमिनीवर अर्जदार गेल्या ५५ वर्षांपासून वहीत करीत आहेत. सदर जमीन अर्जदारांना देण्याबाबत तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांनी लेखी आदेश दिले असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, महसूल विभागातील क्लार्क भगवान सानप यांनी जमीन देण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. तसेच विश्वेश्वर खेडकर यांनी अन्य व्यक्तींना सोबत घेऊन दमदाटी केल्याचेही अर्जदारांनी म्हटले आहे.

ऊसतोड कामगारांच्या नोंदणीसाठी राज्यात विशेष मोहीम

मंत्री संजय राठोड यांची घोषणा । कोपरगावात ऊसतोड कामगारांसोबत साजरी केली दिवाळी

● शिर्डी । वीरभूमी–



राज्यातील शेतकरी, शेतमजूर आणि ऊसतोड कामगारांच्या समस्या जाणून घेण्यासाठी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना, कोळपेवाडी आणि सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना, संजीवनीनगर येथे भेट देऊन कामगारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष ऊसाच्या फडात जाऊन ऊसतोडणीच्या कामाचा अनुभव घेत कामगारांच्या अडचणी जाणून घेतल्या. दिवाळीनिमित्त कामगारांना शिधा किटचे वाटपही करण्यात आले.

यावेळी आमदार आशुतोष काळे, आमदार विवेक कोल्हे, तहसीलदार महेश सावंत, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, साखर कारखान्यांचे संचालक, व्यवस्थापकीय संचालक, अधिकारी, शेतकरी आणि ऊसतोड कामगार उपस्थित होते.

संवादादरम्यान अनेक ऊसतोड कामगारांची महामंडळाकडे नोंदणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले. नोंदणीअभावी पात्र कामगार शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग आणि संबंधित महामंडळाच्या माध्यमातून राज्यात विशेष नोंदणी मोहीम राबविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत पुढाकार घेणार असल्याचे मंत्री राठोड यांनी स्पष्ट केले.

ऊसतोड कामगार अत्यंत कष्टाचे काम करतात. ते कामासाठी इतर राज्यांतही जातात. त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविणे हा या भेटीचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शाळा व वसतिगृहांची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. वसतिगृहात प्रवेश न मिळाल्यास पात्रतेनुसार योजनांमधून आर्थिक मदत दिली जाईल. तसेच ऊसतोड कामाच्या ठिकाणी आरोग्य शिबिरे आयोजित करणे आणि सुरक्षा साहित्य उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर राहणार आहे.

राज्यातील सर्व साखर कारखाना प्रशासनाने कामगारांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि आवश्यक सुविधांकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. ऊसतोड कामगारांचे प्रश्न मंत्रिमंडळात मांडून त्यांच्या हिताचे ठोस निर्णय घेण्यात येतील. यासाठी राज्यातील विविध साखर कारखान्यांच्या परिसरात भेटी देऊन कामगारांच्या समस्यांचे संकलन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

पावसातील खंडामुळे शेतकरी आणि कामगारांसमोर निर्माण झालेल्या अडचणींवर उपाययोजना करताना आर्थिक मदतीसोबत जलसंधारणाच्या कामांना गती दिली जाईल. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार', नाला खोलीकरण, पाणी अडविणे व मुरविणे आणि सिंचनाचे पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचविण्याची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) व इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून प्रभावीपणे राबविण्यात येतील, असे मंत्री राठोड यांनी सांगितले.

ग्रामसेवकांकडून डोंगरगण शाळेचा पाणीपुरवठा बंद; विद्यार्थ्यांचे हाल

● पारनेर । वीरभूमी –

डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाकडून शाळेचा पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून, पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करण्याची मागणी शाळा प्रशासनाने केली आहे.

यासंदर्भात शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी आमदार अक्षय कर्डिले यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनानुसार, न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सुमारे २८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यातील बहुतांश विद्यार्थी शेतकरी, शेतमजूर आणि विटभट्टी कामगार कुटुंबांतील आहेत.

शाळेला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात होता. मात्र, ग्रामपंचायतीने हा पुरवठा बंद केल्याने विद्यार्थ्यांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पिण्याचे पाणी बंद करण्याचा कोणताही नियम नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता पिण्याच्या पाण्याची सुविधा बंद करणे योग्य नसल्याचे शिक्षकांनी म्हटले आहे.

विद्यार्थ्यांना शुद्ध व पुरेसे पाणी मिळणे आवश्यक असल्याने ग्रामपंचायतीने शाळेचा पाणीपुरवठा तातडीने पूर्ववत सुरू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. आमदार अक्षय कर्डिले यांनी या प्रश्नात लक्ष घालून विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाला सूचना द्याव्यात, अशी अपेक्षा शाळा प्रशासनाने व्यक्त केली.

दरम्यान, शाळेचा पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करण्यास सांगू, असे आश्वासन आमदार अक्षय कर्डिले यांनी दिले आहे. या प्रश्नाची आमदार कर्डिले कशी दखल घेतात, याकडे डोंगरगण ग्रामस्थ आणि पालकांचे लक्ष लागले आहे.

पाडोशी जि. प. शाळेत साकारला भव्य मातीचा किल्ला

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग । ऐतिहासिक वारशाची ओळख जपणारा उपक्रम

● अकोले । वीरभूमी–



दीपोत्सवाच्या आनंदी वातावरणात अकोले तालुक्यातील दुर्गम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाडोशी येथे विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागातून भव्य व विहंगम मातीचा किल्ला साकारण्यात आला.

दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या दैदीप्यमान ऐतिहासिक वारशाची ओळख जपण्यासाठी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मातीचे किल्ले बनविण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

शिवछत्रपतींच्या गड-किल्ल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, त्यांच्यात ऐतिहासिक मूल्यांची रुजवण व्हावी आणि संघटितपणे कार्य करण्याची सवय लागावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी स्वतः माती मळून विविध बुरुज, तटबंदी, मुख्य प्रवेशद्वार आणि पायऱ्या अत्यंत कुशलतेने साकारल्या. या सुंदर किल्ल्यावर आकर्षक रंगकाम, भगवे झेंडे आणि सायंकाळी लावलेल्या पणत्यांमुळे किल्ल्याचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत होते.

या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक भास्कर गावंडे, बहिरू साबळे, सुवर्णा जाधव आणि वंदना तळपाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

अभिनव शिक्षण संस्थेत 'सांज दीपावली' कार्यक्रम

लोककवी प्रशांत मोरे यांच्या काव्यप्रस्तुतीने रसिक मंत्रमुग्ध

'आई... तुझा हात परिस...' कार्यक्रमातून आईची माया, संस्कार आणि कौटुंबिक नात्यांचा भावस्पर्शी आविष्कार

● अकोले । वीरभूमी–

अभिनव शिक्षण संस्था, बुवासाहेब नवले सहकारी पतसंस्था व मल्टीस्टेट सोसायटी, अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने अभिनव शिक्षण संकुलातील वसुंधरा लॉन्स येथे गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी 'सांज दीपावली' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. लोककवी प्रशांत मोरे यांच्या 'आई... तुझा हात परिस...' या भावस्पर्शी काव्यप्रस्तुतीने कार्यक्रमात उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष मधुकरराव नवले यांच्या हस्ते लोककवी प्रशांत मोरे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख आणि मारुतराव कोते पब्लिक स्कूलच्या प्राचार्या अल्फोन्सा डी. यांच्या हस्ते कवी संजय आहेर यांचा सन्मान करण्यात आला.

लोककवी प्रशांत मोरे यांनी आपल्या काव्यप्रस्तुतीतून आईच्या मायेचे, त्यागाचे, कष्टांचे आणि निःस्वार्थ प्रेमाचे महत्त्व प्रभावीपणे उलगडले. आईच्या हातच्या घासातील माया, तिच्या संस्कारांतून घडणारे व्यक्तिमत्त्व आणि कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारी तिची भूमिका यांचे हृदयस्पर्शी चित्रण त्यांच्या सादरीकरणातून झाले. प्रशांत मोरे व संदीप आहेर यांनी आई-वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी भावपूर्ण गीते सादर केली.

अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष मधुकरराव नवले यांनी उपस्थित पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी बुवासाहेब नवले पतसंस्थेचे व्हाइस चेअरमन रमेश जगताप, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश टाकळकर, पत्रकार हेमंत आवारी, आबासाहेब मंडलिक, अमोल वैद्य, ड. सागर शिंदे, माजी प्राचार्य विलास नवले, ह.भ.प. दीपक महाराज देशमुख आणि सेवानिवृत्त शिक्षिका प्रतिभा घुले उपस्थित होते. संस्थांचे संचालक मंडळ, पदाधिकारी, विविध विभागांचे प्राचार्य, शिक्षक, पालक आणि नागरिकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

अभिनव पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले. वसुंधरा अकॅडमीच्या विद्यार्थिनींनी 'मिळणार नाही, विसरू नको रे आई-बापाला; मिळणार नाही तुला आई-बापाची माया' आणि 'ज्योत से ज्योत जगाते चलो' ही भावस्पर्शी गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत मंडलिक यांनी केले.

दीपावली हा केवळ दिव्यांचा आणि रोषणाईचा सण नसून प्रेम, आपुलकी, कृतज्ञता आणि नात्यांमधील गोडवा जपण्याचा उत्सव आहे. विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना सांस्कृतिक व्यासपीठावर एकत्र आणणारा हा उपक्रम भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीच्या दृष्टीने



महत्त्वपूर्ण ठरला.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, कौटुंबिक मूल्ये, संस्कार आणि संवेदनशीलता विकसित व्हावी, यासाठी अभिनव शिक्षण संस्था विविध उपक्रम राबविते. 'सांज दीपावली' कार्यक्रमातून भारतीय संस्कृती, नात्यांची जपणूक, आई-वडिलांप्रती आदर आणि जीवनमूल्यांचे महत्त्व अधोरेखित झाले. हा कार्यक्रम उपस्थितांसाठी आनंददायी आणि भावस्पर्शी अनुभव ठरला.

वीरभूमी

दुष्काळात गोरगरिबांची दिवाळी गोड करण्यासाठी शिवसेनेचा पुढाकार

अकोलेत आनंदाचा शिधा वाटप । शेतकरी, कष्टकऱ्यांना मदतीचा हात देण्याचा एकनाथ शिंदे यांचा संदेश

● **अकोले । वीरभूमी –**

राज्यातील प्रत्येक गोरगरीब, शेतकरी आणि कष्टकऱ्याची दिवाळी गोड झाल्याशिवाय मला दिवाळीचा एकही घास गोड लागणार नाही, अशी भावना उपमुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख एकनाथ शिंदे यांची आहे. त्यामुळे राज्यातील ३६ जिल्ह्यांतील गाव, वाडी आणि वस्त्यांवर त्यांनी आनंदाचा शिधा पाठविला आहे. राज्यावर कोणतेही संकट आले, तरी मदतीसाठी शिवसेनेचा, अर्थात एकनाथ शिंदे यांचा दरवाजा नेहमी उघडा असेल. प्रार्थना करणाऱ्या ओठांपेक्षा मदत करणारे हात मोठे असतात. कितीही मोठे संकट आले, तरी निराश होऊ नका. राज्याचा उपमुख्यमंत्री तुमचा भाऊ म्हणून प्रत्येक संकटात तुमच्या पाठीशी उभा आहे, हा संदेश एकनाथ शिंदे यांनी दिला असल्याचे विधान परिषदेच्या खासदार ज्योती वाघमारे यांनी सांगितले.

सर्वसामान्यांना दुष्काळात मदतीचा हात देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मातोश्री लॉन्स येथे आनंदाचा शिधा वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शिर्डी देवस्थानचे विश्वस्त डॉ. जालिंदर भोर यांच्या अध्यक्षतेखाली खासदार ज्योती वाघमारे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार अमोल खताळ, शिवसेना नेते मारुती मेंगाळ आणि सुवर्णा मेंगाळ यांच्या हस्ते गोरगरिबांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला.

यावेळी मुकुंद शिंनगर, शिवसेना अकोले तालुकाप्रमुख सुशांत गजे, शहराध्यक्ष सचिन शेटे, जगन देशमुख, बाळासाहेब भोर, युवा सेना नेते मुकुंद भोर, संजय वाकचौरे, जावेद जाहगीरदार, सतीश पाचपुते, गणेश पापळ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खासदार ज्योती वाघमारे म्हणाल्या की, निवडणुका नसल्या तरी चालतील; मात्र शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन गोरगरीब शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्याचे आदेश एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. खासदार झाल्यानंतरही खास होऊन जगू नका, सर्वसामान्यांमध्ये मिसळून काम करा, अशी शिकवण शिंदे साहेबांनी दिली.

ज्या मुलीला आयुष्यात कधी दिवाळी साजरी करता आली नाही, तिला खासदार बनवून भाऊबीजेची भेट देणारे नेते एकनाथ शिंदे आहेत. आज मिळणारा आनंदाचा शिधा ही भावाची ओवाळणी असून, त्यात भावाचे प्रेम आहे. राज्यात दुष्काळाचे संकट आहे. या संकटाशी लढूया, आसमानी संकटाचा सामना करूया आणि हार मानू नका. आपले भाऊ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सदैव आपल्या पाठीशी आहेत, असे त्यांनी सांगितले.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे म्हणाले की, राज्यावर मोठे संकट आले असून, त्यावर मात करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत.



दिवाळीत आपल्या भावाने, राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी आनंदाचा शिधा पाठविला आहे. आपली सदैव काळजी घेणारे नेतृत्व एकनाथ शिंदे आहेत. अकोले तालुक्यातील जनता समजदार असून, तिला काय करायचे हे सांगण्याची गरज पडत नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ म्हणाले की, राज्यात दुष्काळाचे संकट असताना दिवाळीचा सण आला आहे. दिल्लीसह महाराष्ट्रात अनेक आंदोलने सुरू आहेत. देशात आणि राज्यात अनेक मोठे राजकीय पक्ष व नेते आहेत. मात्र, दुष्काळात शेतकरी आणि कष्टकरी जनतेची आठवण कुणाला झाली नाही. एकनाथ शिंदे यांनी बळीराजाला मदतीचा हात देण्याचे काम केले आहे.

दुष्काळात शेतकरी आणि कष्टकरी माणसाची दिवाळी गोड करण्यासाठी त्यांच्या बांधावर जाऊन आनंदाचा शिधा पोहोचविण्याचे निर्देश शिंदे यांनी दिले आहेत. अकोले तालुक्यातील शिवसैनिक अतिशय चिकाटीने पक्षाचे काम करत आहेत. शिवसेनेचे पदाधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचे प्रश्न सोडवतील. मी आणि खासदार कायम त्यांच्या पाठीशी आहोत.

अकोले तालुक्याचे संगमनेर आणि खालच्या भागावर मोठे उपकार आहेत. अकोले तालुक्याच्या योगदानातूनच खालच्या भागाला पाणी मिळाले आहे आणि मिळत आहे. अकोले तालुक्याचे नेते मारुती मेंगाळ यांनी उपमुख्यमंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केल्याने अकोले नगरपंचायतीला विकासासाठी लवकरच मोठा निधी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शिवसेना नेते मारुती मेंगाळ म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी गोरगरीब आणि गरजू लोकांची दिवाळी गोड करण्यासाठी आनंदाचा शिधा पाठविला आहे. त्यांच्या माध्यमातून हा मदतीचा योग आला आहे. राज्यात दुष्काळाच्या परिस्थितीत जनतेला मदतीचा हात देणारा एकमेव पक्ष शिवसेना आणि एकमेव नेता एकनाथ शिंदे आहेत.

डॉ. जालिंदर भोर म्हणाले की, फुल ना फुलाची पाकळी म्हणून गोरगरिबांची दिवाळी गोड करण्यासाठी आनंदाचा शिधा पाठविण्यात आला आहे. गरिबीची जाण असलेला नेता आणि माणसातील देवमाणूस म्हणजे एकनाथ शिंदे आहेत. जिथे आपत्ती येते, तिथे शिवसेना उभी असते. सामाजिक उपक्रम म्हणून मदतीचा हात देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकुंद भोर यांनी केले. प्रास्ताविक बाळासाहेब भोर यांनी केले, तर आभार तालुकाप्रमुख सुशांत गजे यांनी मानले.

जिल्हा बँकेपेक्षा सर्वसामान्यांच्या मदतीला प्राधान्य

■ जिल्हा बँकेच्या निवडणुकीत लोक पैसे वाटून मते मागत होते; मात्र आम्ही शिवसैनिक गोरगरीब जनतेच्या याद्या तयार करून त्यांना मदत करण्याचे धोरण आखत होतो. जिल्हा बँकेची निवडणूक सहकार सम्राटांची होती. त्यात आपण कमी पडलो; मात्र सर्वसामान्यांची जिल्हा परिषद निवडणूक लागेल, तेव्हा शिवसेनेला विचारल्याशिवाय निवडणूक होऊ शकणार नाही. शिवसेनेच्या विचारांचे जास्तीत जास्त सदस्य निवडून यावेत, यासाठी काम करणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

वंचितांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवून जेएसएस गुरुकुलने जपले संस्कारांचे दीप!

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, फटाक्यांचा आनंद आणि नवीन कपड्यांची खरेदी नव्हे, तर आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याचा आणि माणुसकीचा प्रकाश सर्वत्र पसरविण्याचा सण आहे. हाच दिवाळीचा खरा अर्थ कृतीतून जपत केडगाव येथील जेएसएस गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी आरणगाव येथील मानव सेवा प्रकल्पातील वंचितांसोबत दिवाळी साजरी केली. विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत किराणा साहित्य, कपडे, अन्नधान्य, साफसफाईचे साहित्य तसेच दैनंदिन वापरातील विविध जीवनावश्यक वस्तू भेट देत गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला. प्राचार्य आनंद कटारिया आणि निकिता कटारिया यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ मदतकार्य न ठरता माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीचे संस्कार देणारा अनुभव ठरला.

दिवाळीच्या सणाचा आनंद प्रत्येकाला मिळावा आणि समाजातील वंचित घटकांनाही सणाचा गोडवा अनुभवता यावा, या उद्देशाने जेएसएस गुरुकुलच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्राचार्य आनंद कटारिया यांनी विद्यार्थ्यांना आपापल्या घरून शक्य होईल त्या स्वरूपात मदत घेऊन येण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतेनुसार विविध वस्तू गोळा केल्या. काही विद्यार्थ्यांनी किराणा साहित्य, काहींनी कपडे, तर काहींनी साफसफाईसाठी लागणारे साहित्य आणले. याशिवाय अन्नधान्य आणि दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या वस्तूंचाही समावेश करण्यात आला. एकत्रितपणे जमा केलेले हे साहित्य मानव सेवा प्रकल्पातील गरजूंसाठी भेट देण्यात आले.

मानव सेवा प्रकल्पाला भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांना तेथील वंचितांची परिस्थिती, त्यांचे संगोपन, दैनंदिन गरजा आणि प्रकल्पाच्या माध्यमातून त्यांची घेतली जाणारी काळजी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. समाजातील गरजू घटकांसाठी कोणत्या प्रकारे सेवा आणि मदतकार्य केले जाते, याची प्रत्यक्ष माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन समाजातील वास्तव परिस्थिती समजून घेण्याची संधी या भेटीमुळे विद्यार्थ्यांना मिळाली.

प्रकल्पाचे कार्य आणि तेथील वंचितांची परिस्थिती जाणून घेताना अनेक विद्यार्थी भावूक झाले. आपल्या आजूबाजूला अनेक जण विविध अडचणींना सामोरे जात असतात, त्यांना मदतीचा हात देणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली. दिवाळीचा आनंद केवळ स्वत:पुरता मर्यादित न ठेवता गरजूंच्या जीवनातही आनंदाचे क्षण निर्माण करण्याची प्रेरणा या उपक्रमातून मिळाली.

विशेष म्हणजे, या भेटीनंतर विद्यार्थ्यांनी केवळ दिवाळीपुरतेच मदतकार्य मर्यादित न ठेवता यापुढे आपले वाढदिवस आणि जीवनातील विविध आनंदाचे प्रसंगही मानव सेवा प्रकल्पातील वंचितांसोबत सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरे करण्याचा संकल्प व्यक्त केला.

या उपक्रमाबद्दल मानव सेवा प्रकल्पाच्या वतीने जेएसएस गुरुकुलचे प्राचार्य आनंद कटारिया आणि निकिता कटारिया यांचे विशेष कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देणे पुरेसे नसून त्यांच्यामध्ये माणुसकी, संवेदनशीलता, सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि गरजूंबद्दल आपुलकीची भावना निर्माण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जेएसएस गुरुकुलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच असे संस्कार देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य होत असल्याची भावना प्रकल्पाचे जाधव यांनी व्यक्त केली.

ए.डी.एम.एल.टी. परीक्षेत मोहिनी खेडकर प्रथम

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**



वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात कर्डिले ब्युरो नर्सिंग होम, यश प्यारा मेडिकल इन्स्टिट्यूट, यश अलाईड आणि शुभ नर्सिंग या संस्थेच्या ए.डी.एम.एल.टी. अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये कु. मोहिनी मल्हारी खेडकर हिने शैक्षणिक गुणवत्तेत प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल तिचे पालकांनी आनंद व्यक्त करत संस्थेच्या वतीने मिळालेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी मोहिनीचे वडिल मल्हारी खेडकर म्हणाले की, मुलीच्या यशामागे तिची मेहनत, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांचा मोठा वाटा आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या यशामध्ये शिक्षक, प्राचार्य आणि संस्थेच्या व्यवस्थापनाचे योगदानही तितकेच महत्त्वाचे असते. या संस्थेत विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान दिले जात नाही, तर शिस्त, संस्कार, आत्मविश्वास आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारे मार्गदर्शनही केले जाते. त्यामुळेच विद्यार्थ्यांना आपल्या स्वप्नांना गवसणी घालणे शक्य होत आहे.

संस्थापक अध्यक्ष बाबुराव कर्डिले, सौ. मंगल कर्डिले, प्राचार्य, सर्व शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मार्गदर्शनामुळे मोहिनीला हे यश संपादन करता आले. याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले. प्रास्ताविक कोमल पंचमुख यांनी केले.

मोहिनी खेडकर हिने विद्यार्थ्यांना संदेश देताना त्यांनी सांगितले की, प्रत्येक विद्यार्थ्याने आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून गुरुजनांचा सन्मान करावा. मेहनत, प्रामाणिकपणा, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आयुष्यात मोठे यश संपादन करावे. आपल्या यशातून आई-वडील आणि शिक्षकांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे हास्य फुलवावे. संस्थेच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होत असून, संस्थेची अशीच उत्तरोत्तर प्रगती व्हावी, अशा शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या.

मंत्री म्हणून लोकांची जबाबदारी कुटुंबाप्रमाणे स्वीकारावी लागते!

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची सामाजिक बांधिलकीची भावना

● **शिर्डी । वीरभूमी–**

सार्वजनिक जीवनात काम करताना केवळ पद, अधिकार आणि राजकीय जबाबदारीपुरता विचार करून चालत नाही. आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्या सामान्य माणसांच्या अपेक्षा समजून घेऊन त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे महत्त्वाचे असते. मंत्री म्हणून लोकांची जबाबदारी कुटुंबातील सदस्यांप्रमाणे स्वीकारून काम करावे लागते. दुष्काळाच्या संकटात पाण्याचे नियोजन करताना मनावर प्रचंड दबाव असतो, अशी भावना राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

शिर्डी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना मंत्री विखे पाटील यांनी राज्यातील दुष्काळाची दाहकता आणि सरकार व जलसंपदा मंत्री म्हणून घ्याव्या लागणाऱ्या निर्णयांवर भाष्य केले.

राज्यात दुष्काळाची दाहकता मोठी असून सांगली, सातारा आणि कोल्हापूर भागातही यंदा पाण्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. मराठवाड्यात परिस्थिती आणखी गंभीर आहे. सर्व जिल्ह्यांत जाऊन पाण्याचे नियोजन केले. निसर्गाने थोडी साथ दिल्यामुळे आपल्याकडे पाणी उपलब्ध आहे. मात्र, धरणातील पाणीसाठा, संबंधित भागातील गरजा आणि शेतीसाठी पाण्याचे नियोजन करताना प्रचंड दबाव असतो. नियोजनात चूक होऊ नये आणि एखाद्या गंभीर चुकीचे परिणाम भोगावे लागू नयेत, याची काळजी घेऊन काम करावे लागते, असे त्यांनी सांगितले.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, लोकांना आम्ही केवळ गाड्यांमधून फिरताना दिसतो. मात्र, सार्वजनिक जीवनात काम करताना कुटुंबाप्रमाणे जबाबदारी स्वीकारावी लागते. राजकारणात अनेक पदे आणि जबाबदाऱ्या मिळतात; मात्र त्यातून सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडविता आला पाहिजे. लोक मोठ्या अपेक्षेने आपल्याकडे येतात. त्यांच्या प्रश्नांकडे कुटुंबातील अडचणींप्रमाणे पाहावे लागते.

शिर्डीच्या विकासात्मक वाटचालीत अनेक चांगले-वाईट प्रसंग आले; मात्र या प्रवासात मनाला कधी स्वार्थ शिवला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

सामान्य माणसाचा विश्वास संपादन करणे ही मोठी जबाबदारी आहे. लोकांच्या प्रश्नांना वेळ देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि शक्य तिथे तातडीने मदत करण्याची भूमिका आजपर्यंत बजावली. त्यामुळेच या भागातील लोकांनी सलग आठ वेळा



प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली, असे मंत्री विखे पाटील यांनी आवर्जून सांगितले.